महाज्योती
ज्ञानदीप समतेचा

सत्यमेव जयते

**महाराष्ट्र शासन**

**इतर मागास बहुजन कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई**

**कार्यालय, व्यवस्थापकीय संचालक, महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती), महाराष्ट्र राज्य, नागपूर**

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, 3 रा माळा, दिक्षाभूमी रोड, श्रध्दानंद पेठ, नागपूर - 440 022**

**दुरध्वनी क्रं.** 0712-2959381 CIN: U85300PN2019NPL187405 **ई मेल** mahajyotingp@gmail.com

**जा.क्र.** महाज्योती, नागपूर/आस्था/परिपत्रक/321/2024-25 **दिनांक** :- 31/01/2025

# -:परिपत्रक:-

**विषय:- JEE/NEET पुस्तक संच वाटप योजनेअंतर्गत NEET प्रशिक्षणाकरीता नव्याने अर्ज करण्यास मुदतवाढ देणेबाबत.**

महाज्योती मार्फत JEE/NEET- 2026 पुस्तक संच वाटप योजनेअंतर्गत विद्यार्थ्यांकडून ऑनलाईन अर्ज मागविण्यात आलेले आहेत.

1. सदर योजनेकरीता अर्ज केलेल्या विद्यार्थ्यांपैकी अर्जांत त्रुटी असलेल्या विद्यार्थ्यांची यादी दि.26/12/2024 रोजी महाज्योतीच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करुन त्रुटी असलेल्या विद्यार्थ्यांना कागदपत्रांची पुर्तता करण्याकरीता दि.31/12/2024 रोजी पर्यंत मुदतवाढ तसेच JEE/NEET पुस्तक संच वाटप योजनेकरीता नव्याने अर्ज करण्याची संधी देखील देण्यात आलेली होती.
2. दि.31/12/2024 रोजी पर्यंत एकूण- 5024 अर्ज या कार्यालयास प्राप्त झालेले होते त्यापैकी एकूण- 3473 अर्ज पात्र व एकूण- 1551 अपात्र ठरलेले आहे.
3. सदर योजनेकरीता पात्र ठरलेल्या तसेच ज्या विद्यार्थ्यांची JEE/NEET/MHT-CET- 2026 परीक्षा पूर्व प्रशिक्षणाकरिता निवड झालेली आहे व ज्या विद्यार्थ्यांनी पुस्तक संचाबाबत पर्याय निवडलेला आहे, अशा विद्यार्थ्यांची JEE/NEET पुस्तक संच योजनेकरीता मेरीटद्वारे निवड यादी तसेच NEET करीता अर्ज केलेल्या विद्यार्थ्यांपैकी अर्जांत त्रुटी असलेल्या विद्यार्थ्यांची यादी दि.30/01/2025 रोजी महाज्योतीच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आलेली आहे.
4. NEET पुस्तक संच योजनेकरीता NEET प्रशिक्षणाकरीता पुरेशा प्रमाणात अर्ज प्राप्त न झाल्याने NEET करीता अर्ज केलेल्या विद्यार्थ्यांपैकी अर्जांत त्रुटी असलेल्या विद्यार्थ्यांना त्रुटी पुर्तता करण्याकरीता तसेच NEET पुस्तक संच वाटप योजनेकरीता नव्याने अर्ज करण्यासाठी दि.15/02/2025 रोजी पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे. याची संबंधित विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.
5. प्राप्त अर्जांची छाननी करुन महाज्योतीच्या अटी व शर्तींच्या अधीन राहून मेरीटद्वारे पात्र विद्यार्थ्यांची निवड करण्यात येईल.

(स्वा.)
विकास गडपायले
**प्रकल्प व्यवस्थापक**
महात्मा ज्योतीबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था
(महाज्योती), महाराष्ट्र राज्य, नागपूर.